**डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे**

# फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे – ४

## [ वरिष्ठ महाविद्यालय (Senior College)]

## शिष्यवृत्ती सूचना क्र. (४) २०२४-२५

**कृपया सर्व सूचना पूर्ण वाचल्या नंतरच अर्ज भरणे बंधनकारक आहे.**

शैक्षणिक वर्ष **२०२४-२५** मध्ये ज्या विद्यार्थिनींनी खुल्या (OPEN/EWS//SEBC/OBC) संवर्गातून महाविद्यालयात प्रवेश घेतलेला आहे त्या विद्यार्थिनींनी शासनाने विहित केलेल्या नमुन्यातील छत्रपती राजश्र्री शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना (OPEN/EWS/SEBC/OBC) या सवंर्गसाठी ऑनलाईन अर्ज खालील वेब साईटवर भरावा. तसेच ज्या विद्यार्थिनींनी **२०२४-२५** शैक्षणिक वर्षामध्ये (OPEN/EWS/SEBC/OBC) अंतर्गत प्रवेश घेतला आहे त्या विद्यार्थिनींनी त्यांचा अर्ज Open संवर्गातून म्हणजेच Rajarashi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulk Shishyavrutti Scheme या शिष्यवृत्ती साठी खालील Website वर भरण्यात यावा.

( https://mahadbt.maharashtra.gov.in )

तरी पात्र असलेल्या विद्यार्थिनींनी सदरच्या शिष्यवृत्तीचा अर्ज ऑनलाइन भरून योग्य ती प्रमाणपत्रे आपलोड करून MAHADBT या वेबसाइटवर ऑनलाइनच पुढे महाविद्यालयाकडे वेरीफिकेशन करण्याकरिता दिनांक ३० नोव्हेंबर २०२४ पर्यन्त पाठवावेत आणि हार्ड कॉपी ३० नोव्हेंबर २०२४ पर्यन्त ११.०० ते २.०० या वेळेत महाविद्यालयात शिष्यवृत्ती अर्ज शिष्यवृत्ती विभाग कार्यालयात जमा करावा. विहित मुदतीत अर्ज प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विद्यार्थिनींनीची राहील, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच विद्यार्थिनींनी शिष्यवृत्ती अर्ज स्वतः भरावा दुसऱ्या कोणाकडूनही भरून घेऊ नये.

(OPEN/EWS/SEBC/OBC) या शिष्यवृत्ती संदर्भात सर्व कोर्सेसची माहिती असणारे दिनांक ७ ऑक्टोबर २०१७ हे महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक आपल्या महाविद्यालयाच्या या वेब साईटवर Upload केलेले आहे, या परिपत्रकात समाविष्ट असणाऱ्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थिनींनाच हा अर्ज भरता येईल, तरी कृपया सर्व विद्यार्थिनींनी अर्ज विहित मुदतीत भरावेत व शिष्यवृत्तीचा लाभ घ्यावा.

१. **ऑनलाईन अर्ज भरताना विद्यार्थिनींनी आधार बेसनेच भरणे बंधनकारक आहे नॉन आधार या ऑप्शन चा वापर करू नये तसेच विद्यार्थिनींचे आधारकार्ड असणे आवश्यक आहे. आधारकार्डला मोबाईल नंबर व विद्यार्थिनींचे बँक खाते लिंक असणे आवश्यक आहे तसेच बँक खाते हे NPCI पोर्टल ला लिंक असणे अत्यावश्यक आहे त्या शिवाय शिष्यवृत्ती लाभाची रक्कम विद्यार्थिनींच्या खात्यावर जमा होणार नाही, तसेच महाविद्यालयाच्या खात्यावरहि जमा होणार नाही तसे आढळून आल्यास विद्यार्थिनींची फीची उर्वरित रक्कम महाविद्यालयात जमा करावी लागेल. तसेच MAHADBT या वेब साइटवर आधार बँक लिंक Aadhaar bank link हा नवीन Tab सुरू करून देण्यात आला आहे, सर्व विद्यार्थिनींना असे सूचित करण्यात येते की या Tab वर क्लिक करून आपले आधार नंबर सेव्हिंग बँक अकाऊंटला लिंक आहे की नाही हे तपासून घ्यावे. अन्यथा विद्यार्थिनींच्या बँक अकाऊंट मध्ये रक्कम जमा होणार नाही. याची गांभिर्याने नोंद घ्यावी.**

२. **OBC प्रवर्गातील विद्यार्थिनी जर समाजकल्याण विभागातील इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेत असतील, तर त्या विद्यार्थिनींना या सदरच्या योजनेचा लाभ घेता येणार नाही शासकीय नियमांनुसार कोणत्याही एकाच शिष्यवृत्तीचा लाभ घेता येणार आहे.**

३. ऑनलाईन अर्ज भरताना आधार कार्डला लिंक असलेल्या मोबाईल वर OTP येतो तो Verified करावा.

४. खालील शिष्यवृत्ती/ फ्रीशिप चा अर्ज भरण्यासाठी विद्यार्थिनींनी http://mahadbtmahait.gov.in या वेबसाईटवर लॉगीन करून त्यातील Profile मधील सहा टॅब (Personal Information, Address Information, Other Information, Current Course, Past Qualification, Hostel Details) व्यवस्थित भरणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थिनी द्वितीय (SY) व तृतीय (TY) तसेच M.Sc. II प्रवेशीत आहेत अशा विद्यार्थिनींनी त्यांचे अर्ज नूतनीकरण करणे आवश्यक आहे. अशा विद्यार्थिनींनी मागील वर्षी भरलेली माहिती तपासून पहावी.

५. ऑनलाईन वेबसाईटवर ३५ प्रकारच्या शिष्यवृत्ती दिलेल्या आहेत त्यापैकी विद्यार्थिनींनी लागू असलेल्या छत्रपती राजर्श्री शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना शिष्यवृत्तीचा पर्याय निवडून त्या शिष्यवृत्तीचा अर्ज भरणे आवश्यक आहे.

६. विद्यार्थिनींनी ऑनलाइन अर्ज भरतांना मागील वर्षातील परीक्षेचे गुण भरताना टक्केवारी (उदा.  % )मध्ये भरावे, CGPA मध्ये भरू नये.

७. शिष्यवृत्ती अर्ज संकेतस्थळावर भरून महाविद्यालयात जमा केल्या नंतर त्या अर्जा मध्ये काही त्रुटि आढळल्यास महाविद्यालयाकडून असे अर्ज दुरूस्ती करिता विद्यार्थिनींच्या ऑनलाइन लॉगिनला परत पाठविले (Resend) जातील. परत पाठविलेले अर्ज विद्यार्थिनींनी दुरूस्ती करून ताबडतोब महाविद्यालयाच्या लॉगिनला पाठवावेत व त्या अर्जाची प्रत महाविद्यालयात जमा करावी.

८. शिष्यवृत्ती धारक विद्यार्थिनींनी आधार क्रमांक बँक खात्याशी संलग्न आहेत की नाही याची पडताळणी / खातरजमा आधार पोर्टल  या लिंक वरती जाऊन करावी, तसेच आधार ॲक्टिव आहे किंवा नाही याबाबत देखील सादर पोर्टल वरुन खातरजमा करावी.

९. ज्या विद्यार्थिनींनी विहित मुदतीत अर्ज सादर करणार नाहीत त्यांना शासनाकडून शुल्क प्राप्ती होणार नाही व त्यांना उर्वरित  शैक्षणिक शुल्काची रक्कम महाविद्यालयात भरणे बंधनकारक राहील .

१०. शिष्यवृत्ती अर्ज भरताना विद्यार्थिनींनी Under tacking चा फॉर्म ऑनलाइन MAHADBT वेबसाइट वरून डाउनलोड करून भरावा आणि त्या नंतर अपलोड करावा.

११. सर्व शिष्यवृत्ती धारक विद्यार्थिनींनीना असे सूचित करण्यात येते की ऑनलाइन रजिस्ट्रेशन करतांना त्यांनी आपला स्वतःचा मोबाइल नं द्यावा आणि तो मोबाइल नं आधार कार्ड व बँक अकाऊंट यांच्याशी लिंक करावा, आणि सर्वात महत्वाचे जो मोबाइल नं  रजिस्टर केला आहे तो कुपया बदलू  नये, जर कोणी मोबाइल नं बदलला आणि शिष्यवृत्ती चे पैसे त्यांच्या बँक अकाऊंटला जमा झाले नाहीत तर त्याला पुर्णपणे संबंधित विद्यार्थिनींची जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

**4) (OPEN/EWS/EBC/SEBC/OBC) Scholarship साठी :-**

**<u>Director of Higher Education मध्ये</u>**

- RajarashiChhatrapatiShahuMaharajShikshanShulkShishyavrutti Scheme (EBC)

**दिनांक :०७/११/२०२४** **प्राचार्य**

**खुल्या ((OPEN/EWS/SEBC/OBC) संवर्गातील छत्रपती राजाश्री शाहू महाराज शिष्यवृत्ती साठी आवश्यक प्रमाणपत्र.**

१) रहिवाशी दाखला तहसीलदार अधिकाऱ्याने प्रमाणित केलेला.

२) उत्पन्न प्रमाणपत्र तहसीलदार अधिकाऱ्याने प्रमाणित केलेले.

३) आधार कार्ड .

४) रेशन कार्ड .

५) बँक पासबुक झेरॉक्स विद्यार्थ्यांचे.

६) आधार कार्ड आणि बँक अकाउंट लिंक असलेले प्रमाणपत्र.

७) फी चलन.

८) मागील वर्षाची गुणपत्रिका.

९) दोन पेक्षा जास्त अपत्यांनी शिष्यवृत्ती न घेतलेले पालकांचे हमीपत्र.